N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कोपरगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0548 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/12/2024 07:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 09/12/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/12/2024
**Time From (वेळेपासून):** 16:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:56 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/12/2024 **Time (वेळ):** 06:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/12/2024 07:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** छत्रपती संभाजी महाराज चौकातील

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सचिन सुभाष जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सतोषीमाता मदिरा जवळ इदिरानगरक,कोपरगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सतोषीमाता मदिरा जवळ इदिरानगरक,कोपरगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8055379379

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रकांत नानासाहेब चांडे | | | 1. कला साई बंगला, सम्यक नगर, कोपर,कोपरगांव,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | योगेश दत्तात्र्य पालवे | | | 1. भंडारी कलनी, एमआयडीसी नाग,कोपरगांव,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | प्रतिक उर्फ ख-या मोहन कोळपे | | | 1. रा कोळपेवाडी ताकोपरगाव,जि ,कोपरगांव,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रूपये दराच्या 30 चलनी नोटा | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये))**:**

15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास))**:**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

मी, श्री. सचिन सुभाष जाधव, वय-36 वर्षे धंदा- वाळु पुरवठा, राहणार- संतोषी माता मंदीरा जवळ, इंदिरा नगर, ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर. मोबाईल नंबर 8055379379
समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबीयांसह राहत असुन मी माझेकडे असलेल्या ट्रॅक्टर व ट्रॉलीद्वारे कोपरगांव तालुक्यात वाळु पुरवठा करण्याचा व्यवसाय करून माझ्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करतो. साधारण आठ ते दहा दिवसांपुर्वी माझे ओळखीचा वाळु वाहतुक करणारा प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे, राहणार- शिवपद्मा पेट्रोल पंपाचे पाठीमागे, महेश्वर नगर, कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जिल्हा अहिल्यानगर मोबाईल नंबर- 9503448733 याने मला सांगितले की, यापुर्वी असलेल्या तहसिलदार, कोपरगांव यांनी कोपरगांव व परिसरात अवैध गौण खणिज (वाळु, माती, दगड, मुरुम) उत्खनन व वाहतुक करीत असलेल्या वाहनांवर कायदेशीर कारवाई करणेसाठी योगेश दत्तात्रय पालवे, अव्वल कारकुन व चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक, दोन्ही नेमणुक- तहसिलदार कार्यालय, कोपरगांव यांना नेमलेले असुन योगेश दत्तात्रय पालवे, अव्वल कारकुन व चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक यांनी मी करीत असलेल्या वाळु वाहतुकीच्या वाहनावर कायदेशीर कारवाई न करण्याचे मोबदल्यात दरमहा त्यांना 15,000/- रूपये लाच म्हणुन दयावे लागतील, मी त्यांना दरमहा 15,000/- रूपये लाच म्हणुन दिले नाहीतर ते माझ्या ट्रॅक्टर व ट्रॉलीवर विनाकारण कारवाई करतील. मला योगेश दत्तात्रय पालवे, अव्वल कारकुन व चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक यांना 15,000/- रूपये लाच म्हणुन देण्याची इच्छा नाही. मी करीत असलेले काम कायदेशीर असुन माझ्यात व योगेश दत्तात्रय पालवे, अव्वल कारकुन व चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक यांच्यात उधार ऊसणवारीचा व्यवहार नसुन त्यांच्यात व माझ्यात काही एक वैमनस्य नाही.
माझे ओळखीचा प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे याने मला 8 ते 10 दिवसापुर्वी सांगितल्याप्रमाणे मी आज दिनांक 06/12/2024 रोजी योगेश दत्तात्रय पालवे, अव्वल कारकुन व चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक यांना भेटण्यास जाणार आहे. त्यावेळी ते मी वाळु पुरवठा करण्यासाठी वापरत असलेल्या ट्रॅक्टर व ट्रॉलीवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे लाचेची मागणी करतील व मी त्यांना लाच न दिल्यास मी वाळु पुरवठा करण्यासाठी वापरत असलेल्या ट्रॅक्टर व ट्रॉलीवर विनाकारण कारवाई करतील. तरी सदर बाबत पडताळणी करून त्यांचेवर योग्य ती कायदेषिर कारवाई करणेसाठी मी दिनांक 06/12/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक विभाग कडील पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर यांचेकडे लेखी तक्रार दिली होती.
मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी दिनांक 06/12/2024 रोजी योगेश दत्तात्रय पालवे, अव्वल कारकुन व चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला व

पंच श्री. हेमंत ओहोळ यांचेसह पडताळणी कारवाईकामी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून मला तहसिलदार कार्यालय, कोपरगांव येथे पाठविले असता चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक हे कोपरगांव तहसिलदार कार्यालयाच्या शेजारी असलेल्या कोपरगांव पंचायत समितीचे आवाराच्या गेट जवळ थांबुन तेथे उभे असलेल्या इसमांशी बोलत असतांना मला दिसले व थोडयावेळाने ते मोटार सायकलवर तेथुन निघुन जातांना दिसले. त्यावेळी मी माझी मोटार सायकल चालु करून मी त्यांच्या पाठीमागे मोटार सायकलने गेलो असता चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक यांची व माझी भेट नागरे पेट्रोल पंपाचे जवळ धारणगांवकडे जाणा-या सार्वजनिक रस्त्याचे कडेला झाली. त्यावेळी चंद्रकांत चांडे व माझ्यामध्ये मी ट्रॅक्टर-ट्रॉलीव्दारे करीत असलेल्या वाळु पुरवठयाच्या वाहनावर कारवाई न करण्याच्या संबधांने संभाषण झाले. त्यावेळी त्यांनी मला 'किती हे, वाहन किती' असे बोलुन वाळु वाहतुक किती वाहनांनी करीत आहे अशी विचारणा केली असता मी त्यांना 'एकच आहे' असे बोलुन एकाच वाहनाने वाळु वाहतुक करणार आहे असे सांगितले. त्यावर चंद्रकांत चांडे यांनी मला 'साहेबांना दहा हजार, आम्हाला पाच' असे बोलुन त्यांच्या स्वतःसाठी व योगेश पालवे, अव्वल कारकुन यांचेसाठी पाच हजार रूपये व साहेब यांचेसाठी दहा हजार असे एकुण पंधरा हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर चंद्रकांत चांडे यांनी मला 'पंधराने करून टाकायच सगळ, होत असेल तर ठिक नाहीतर...विषय' असे बोलुन चंद्रकांत चांडे यांनी माझ्याकडे मी वाळु पुरवठा करणेकामी वापरत असलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉली याच्यावर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात दरमहा 15,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ' तरी दोन दिवसांनी उदया देऊ का परवा देऊ' असे विचारले असता दोन दिवस तहसिलदार कोपरगांव हे वाळु वाहतुक करणा-या ट्रॅक्टर-ट्रॉली यावर कारवाई करणार असुन दोन दिवसानंतर चंद्रकांत चांडे यांनी मागणी केलेली 15,000/- रूपये लाचेची रक्कम त्यांच्या विश्वासातील इसम नामे प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे याच्याकडे 'खा-याकडं जमा करायच' असे बोलुन सुपुर्द करण्यास सांगितली. सदर बाबत पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर यांनी सविस्तर लाचेची मागणी पडताळणी पंचनामा केला आहे.

त्यानंतर माझेकडे चंद्रकांत नानासाहेब चांडे, महसुल सहाय्यक यांनी दिनांक 06/12/2024 रोजी मागणी केलेली लाचेची रक्कम 15000/- रूपये पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर यांनी मला चंद्रकांत नानासाहेब चांडे यांच्या विश्वासातील इसम नामे प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे यास देणेकामी हजर करण्यास सांगितली असता मी दिनांक 09/12/2024 रोजी 500/- रूपये दराच्या 30 चलनी नोटा असे एकुण 15000/- रूपये त्यांचे समक्ष हजर केले असता त्यांनी मी हजर केलेल्या 15000/- रूपयेच्या नोटांना ॲथ्रासीन पावडर लावून देवुन व इसम नामे प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे यांची भेट झाल्यानंतर त्यांनी मागणी केल्यानंतर ॲन्थ्रासीन पावडर लावलेले 15000/- रूपये लाचेची रक्कम देण्यास सांगितले व इसम नामे प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे याने लाच स्विकारल्यास मी अंगात परिधान केलेल्या शर्टच्या हातांच्या दोन्ही बाहया कोपरापर्यंत घडी करून लाच स्विकारल्याचा इशारा करणेबाबत सर्वांसमक्ष सांगितले त्याबाबत सविस्तर सापळापुर्व पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर माझी दिनांक 09/12/2024 रोजी चंद्रकांत नानासाहेब चांडे यांच्या विश्वासातील इसम नामे प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे याच्या सोबतची भेट कोपरगांव, जिल्हा अहिल्यानगर मधील छत्रपती संभाजी महाराज चौकातील सौरभ साईसेवा भोजनालय येथे होणार असल्याने पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर यांनी माझे सोबत व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला, पंच श्री. हेमंत ओहोळ यांना माझेकडील मोटार सायकलने छत्रपती संभाजी महाराज चौकाकडे रवाना करून त्याठिकाणी गर्दीमध्ये सामील होवून सापळा आयोजित केला असता माझी खाजगी इसम नामे प्रतिक उर्फ खा-या कोळपे याचेशी भेट छत्रपती संभाजी महाराज चौकातील सौरभ साईसेवा भोजनालय येथे झाली. त्याठिकाणी आमची वाळु वाहतुकीच्या अनुषंगाने चर्चा होवून माझ्याकडे चंद्रकांत नानासाहेब चांडे यांनी माझा ट्रॅक्टर -ट्रॉली यावर कोपरगांव तालुक्यातील कुंभारी गावाच्या परिसरातील वाळु वाहतुक करण्यावर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात त्यांचे स्वतःसाठी व त्यांचे सोबत काम करणारे योगेश दत्तात्रय पालवे, अव्वल कारकुन यांचेसाठी 15000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे यास सांगुन मागणी केलेली लाचेची रक्कम चंद्रकांत नानासाहेब चांडे यांनी त्याच्याकडे देण्याबाबत सांगितले आहे इत्यादी सांगुन त्यादरम्यान मी त्यास सदरील लाचेची रक्कम त्याच्याकडे (प्रतिक उर्फ खा-या कोळपे) यास मिळाली असलेबाबत चंद्रकांत नानासाहेब चांडे व योगेश दत्तात्रय पालवे यांना फोनव्दारे सांगण्यास सांगितले असता त्याने त्याचा मोबाईल फोन क्रमांक 9503448733 याचेवरून चंद्रकांत नानासाहेब चांडे यांच्या मोबाईल क्रमांक 8087999922 यावर कॉल करून संभाषण केले व ''मामा, ते 15 एकर नांगरलं बरका त्याचं, ते सचिन भाऊच, सचिन भाऊ जाधव'' असे सांगितले असता त्याने ''तो आपलाच विषय आहे बरं का फक्त'' असे सांगितले, त्यावर प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे याने ''एकटेच का ?'' असे विचारले असता लोकसेवक श्री. चांडे यांनी ''नही नही, पालवे सर आणि मी'' असे सांगितले. त्यावर प्रतिक उर्फ खा-या मोहन कोळपे याने ''हा हा, दोघांचच ना मग'' असे म्हणाला

असता चंद्रकांत नानासाहेब चांडे यांनी ''ते बाकींच कोणी आलं तर त्यांच त्यांच त्यांनी बघुन घ्यायचं' असे सांगितले. त्यावर प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने ''नही, हा, त्यांना सांगितलं ना'' असे म्हणुन लोकसेवक चंद्रकांत चांडे यांना व्हॉट्सअप कॉल करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने त्याच्या मोबाईलमधील व्हॉट्सअपव्दारे लोकसेवक चंद्रकांत चांडे यांच्या मोबाईल मधील व्हॉट्सअपवर संपर्क केला व माझे संभाषण करून दिले. सदरील संभाषणा दरम्यान मी त्यांना त्यांचे सांगणेवरून प्रतिक उर्फ खा-या कोळपे यास 15000/- रूपये लाचेची रक्कम दिली असुन सदरील लाचेची रक्कम त्यांची व पालवे भाऊसाहेब (योगेश दत्तात्रय पालवे) असे दोघांची आहे का ? असे विचारले असता त्यांनी सदरील लाचेची रक्कम त्या दोघांची असल्याची कबुली दिली. त्यानंतर लोकसेवक श्री. चांडे यांनी सांगितल्याप्रमाणे मी लाचेची 15000/- रूपये रक्कम प्रतिक उर्फ खा-या कोळपे याच्या समोर धरली असता त्याने दिनांक 09/12/2024 रोजी 16.55 वाजता त्याच्या डावे हाताने कोपरगांव, जिल्हा अहिल्यानगर मधील छत्रपती संभाजी महाराज चौकातील सौरभ साईसेवा भोजनालय येथे स्विकारली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर व त्यांचे सोबत असणा-या पथकाने प्रतिक उर्फ खा-या कोळपे यास ताब्यात घेतले व काही वेळानंतर लोकसेवक श्री. चांडे याने मागणी केलेल्या व प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने स्विकारलेल्या 15000/- रूपये लाचेच्या रक्कमेमध्ये योगेश दत्तात्रय पालवे यांचा खरोखर सहभाग आहे अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी प्रतिक उर्फ खा-या कोळपे यास त्याचे मोबाईल फोनमधील व्हॉट्सअप वरून योगेश दत्तात्रय पालवे याचे मोबाईल मधील व्हॉट्सअप क्रमांकावर संपर्क करण्यास सांगुन संभाषण करण्यास सांगितले असता प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने त्याचे मोबाईल मधील व्हॉट्सअप वरून योगेश दत्तात्रय पालवे याचे मोबाईल मधील व्हॉट्सअपवर संपर्क करून संभाषण केले. त्यात त्याने लोकसेवक श्री. पालवे यांना सांगितले की, ''सचिन जाधव त्यांनी चांडे भाऊसाहेबांकडे गेले होते ते म्हणाले खा-या ला भेट'' त्यावर लोकसेवक श्री. पालवे यांनी 'बरं' असे म्हणाले असता प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने ''घेवून ठेवतो पंधरा हजार रूपये'' असे सांगितले असता श्री. पालवे यांनी ''किती ? एकच का त्यांच'' असे विचारले असता प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने 'हा' असे सांगितले. त्यावर लोकसेवक श्री. पालवे यांनी 'हा' असे म्हणुन लोकसेवक श्री. चंद्रकांत चांडे यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेमध्ये सहभाग असलेबाबत कबुली देवून प्रतिक उर्फ खा-या कोळपे यास लाचेची रक्कम स्विकारण्यास संमत्ती दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर यांनी प्रतिक उर्फ खा-या कोळपे यास स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत काय करू ? असे लोकसेवक श्री. योगेश पालवे यास विचारण्यास सांगितले असता प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने त्यांना पुन्हा कॉल करून विचारणा केली असता त्याने प्रतिक उर्फ खा-या कोळपे याने स्विकारलेली लाचेची रक्कम त्याच्याकडेच ठेवण्यास सांगुन लोकसेवक श्री चंद्रकांत चांडे यांना संपर्क करण्यास सांगितले. सदरील संभाशण व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड झाले असुन पोलीस उप अधीक्षक संतोष पैलकर यांनी सदर बाबतचा लाचेचा यशस्वी सापळा कारवाई पंचनामा केला आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BHAGWAN HARIBHAU MATHURE(I (Inspector)) / BCMH79922 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in Charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BHAGWAN HARIBHA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH79922